# श्रीमती इंदिरा गांधी
## (दि.१९ नोव्हेंबर,१९१७ ते ३१ ऑक्टोबर,१९८४)
## (अल्प परिचय)

स्वतंत्र भारताच्या पहिल्या लोकप्रिय महिला पंतप्रधान, त्यांचा जन्म दि. १९ नोव्हेंबर, १९१७ रोजी अलाहाबादच्या नेहरू या प्रसिद्ध कुटुंबात झाला. आजोबा पं. मोतीलाल व पिता पं. जवाहरलाल आणि माता सौ. कमला हे सारे कुटुंबच भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होते.

वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी चरखा संघ व लहान मुलामुलींची वानरसेना स्थापन केली आणि महात्मा गांधींच्या सविनय कायदेभंग चळवळीस मदत केली. त्या वेळी वानरसेनेची सभासद संख्या सुमारे ६०,००० होती. त्यांच्या या सेनेचे फार कौतुक झाले. त्या काँग्रेस कार्यकारिणीच्या सन १९५५ मध्ये सदस्या तसेच स्त्रियांच्या समितीच्या अध्यक्षा झाल्या. थोड्याच काळात त्या मध्यवर्ती निवडणूक मंडळ व मध्यवर्ती संसदीय मंडळ यांच्या सदस्या झाल्या.

लालबहादूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर सन १९६६ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. सन १९६७ च्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेसला संसदेत पुन्हा बहुमत मिळाले आणि त्यांचीच बहुमताने पंतप्रधान म्हणून निवड झाली. पुढे इंदिराजींनी सन १९७१ मध्ये लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका घेतल्या. काँग्रेसला तीन चतुर्थांश बहुमत मिळाले व त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. या अवधीत त्यांनी दहा मुद्यांच्या कार्यक्रमानुसार अनेक महत्त्वाची विधेयके मंजूर करून घेतली. तत्पूर्वी भारतातील १४ महत्त्वाच्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करून समाजवादाची आपली भूमिका जनतेसमोर ठामपणे मांडली. याच धोरणानुसार भारतातील राजेरजवाड्यांचे तनखे बंद केले. सन १९७१ च्या सुरुवातीस पूर्व व पश्चिम पाकिस्तानात यादवी युद्धास प्रारंभ झाला. तेव्हा भारताची धर्मनिरपेक्ष व शांतताप्रिय भूमिका त्यांनी स्पष्ट केली. पाकिस्तानने दि. ३ डिसेंबर, १९७१ रोजी भारताविरुद्ध युद्धाची घोषणा करून भारतावर आक्रमण केले. तेव्हा भारतीय फौजांनी मुक्ति वाहिनीच्या मदतीने १४ दिवसांचे युद्ध करून पाकिस्तानचा पराभव केला आणि स्वतंत्र बांगला देशाचा जन्म झाला.

दिनांक ३१ ऑक्टोबर, १९८४ रोजी त्यांच्याच अंगरक्षकांनी केलेल्या हल्ल्यात त्यांचे निधन झाले. सदर दिवस राष्ट्रीय संकल्प दिवस समजण्यात येतो.

******

**( स्रोत सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोष निर्मिती मंडळ)**